मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# विश्वविक्रमी सोहळ्यात भाजपच्या सेवाकार्याचा दमदार ठसा!

## महेश लांडगेंच्या पुढाकारातून रक्तदान, आरोग्य शिबिर, नशामुक्ती अन् गोसेवेचा जागर

» पिंपरी | प्रतिनिधी

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना देण्यासाठी आयोजित भव्य सोहळ्यात भारतीय जनता पार्टीच्या सेवाकार्याचीही ठळक छाप उमटली. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून रक्तदान, आरोग्य शिबिर, नशामुक्त भारताची सामूहिक प्रतिज्ञा, गोसेवा जनजागृती आणि भारतमातेच्या रांगोळीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा जागर करण्यात आला.**

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी आयोजित या ऐतिहासिक सोहळ्यात हजारो ढोलवादक, पथकप्रमुख, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि नागरिकांनी सहभाग घेतला.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याला मानवंदना देतानाच त्यांच्या राष्ट्रनिष्ठा, त्याग, स्वाभिमान आणि समाजहिताच्या विचारांना प्रत्यक्ष सेवाकार्याची जोड देण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला.

एकीकडे हजारो ढोलांचा एकसंध नाद, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद आणि शिव-शंभूंच्या जयघोषाने परिसर दुमदुमत होता; तर दुसरीकडे रक्तदान, आरोग्य जनजागृती, व्यसनमुक्ती आणि गोसेवेच्या माध्यमातून समाजोपयोगी संदेश दिला जात होता. त्यामुळे हा सोहळा केवळ विश्वविक्रमापुरता मर्यादित न राहता समाजजागृती आणि सेवाभावाचा मोठा मंच ठरल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

भाजपाच्या 'सेवा संकल्प अभियानां'तर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवाभावाच्या प्रेरणेतून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या संघटनात्मक मार्गदर्शनातून समाजसेवेची चळवळ अधिक व्यापक




करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. पक्ष संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी या सर्व उपक्रमांच्या नियोजनात सक्रिय सहभाग घेतला.

सरचिटणीस विकास डोळस आणि संजय पटनी यांनी सांगितले की, "शिव-शंभूंचा विचार म्हणजे केवळ जयघोष नव्हे, तर समाजासाठी कृतीशील राहण्याची प्रेरणा आहे. त्यामुळे या विश्वविक्रमी सोहळ्यात सांस्कृतिक अभिमानासोबत समाजसेवेचे उपक्रम राबविण्यावर विशेष भर देण्यात आला."

कार्यक्रमात 'नशामुक्त भारत'ची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. युवकांनी व्यसनांपासून दूर राहण्यासोबतच कुटुंब, मित्रपरिवार आणि समाजामध्ये नशामुक्तीची जनजागृती करण्याचा संकल्प केला. अमली पदार्थ आणि विविध व्यसनांच्या विळख्यात युवा पिढी अडकू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या सामूहिक प्रतिज्ञेला उपस्थित युवक आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. निरोगी, सक्षम आणि राष्ट्राभिमानी युवा पिढी घडविण्यासाठी व्यसनमुक्तीची चळवळ अधिक मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक रक्तदात्यांनी पुढाकार घेत गरजू रुग्णांसाठी रक्तदान केले. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून आपत्कालीन परिस्थितीत एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश शिबिरातून देण्यात आला. रक्तदानासाठी आलेल्या नागरिकांची वैद्यकीय तपासणी करून योग्य मार्गदर्शन करण्यात

> "शिव-शंभूंच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजासाठी प्रत्यक्ष काम करणे ही आपली जबाबदारी आहे. विश्वविक्रमी सोहळ्यात संस्कृतीसोबत रक्तदान, आरोग्य, नशामुक्ती आणि गोसेवेचा सेवाभावही अनुभवायला मिळाला. भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता जनसेवेची बांधिलकी जपत आहे. या उपक्रमात योगदान देणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, रक्तदाते, डॉक्टर, कलाकार, वादक आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार. शिव-शंभूंचा वारसा जपत समाजसेवेचा हा संकल्प पुढे नेऊया!"
>
> **-महेश लांडगे, आमदार तथा अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.**

आले. डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. सांस्कृतिक सोहळ्याच्या निमित्ताने अशा प्रकारचा सेवाभावी उपक्रम राबविल्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष समाजकार्यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पुस्तकांचा महासोहळा; ५०+ प्रकाशक, हजारो पुस्तके!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शहरातील वाचन संस्कृतीला नवी ऊर्जा देण्यासाठी भारतीय विचार साधना फाऊंडेशन आणि स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच भव्य राष्ट्रीय पुस्तक मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ते १० ऑक्टोबरदरम्यान निगडी प्राधिकरणातील सेक्टर २५ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या परिसरात हा मेळा रंगणार आहे.**

मेळ्यात ५० हून अधिक प्रकाशकांची हजारो पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध असतील. इतिहास, संस्कृती, विज्ञान, शेती, पर्यावरण, योग, आरोग्य, संतसाहित्य, अर्थकारण, चरित्रे, कुटुंब प्रबोधन आणि बालसाहित्य अशा विविध विषयांवरील पुस्तकांची मोठी मेजवानी येथे मिळणार आहे.




बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मेळ्याचे उद्घाटन होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरही उपस्थित राहतील.

मेळ्यादरम्यान 'नाटकवाला' पुस्तकाचे अभिवाचन, पुस्तक प्रकाशन, साहित्यिक संवाद, सौहार्द स्लाइड शो आणि कलावंत संवाद अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि दर्जेदार साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. नागरिक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे कार्याध्यक्ष रमेश बनगोंडे यांनी केले आहे. स्थळ : स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ, सेक्टर २५, निगडी प्राधिकरण वेळ : ८ ते १० ऑक्टोबर, सकाळी ९.३० ते रात्री ८.३०

# शिक्षण विभागात 'शालार्थ' घोटाळ्याचा स्फोट!

## कर्मचाऱ्यांच्या नावावर बोगस वेतन?; ५ ते ८ कोटींच्या अपहाराचा नढेंचा गंभीर आरोप

» पिंपरी | प्रतिनिधी

**महापालिकेच्या शिक्षण विभागात 'शालार्थ प्रणाली'चा गैरवापर करून मयत, सेवानिवृत्त तसेच बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नावावर बोगस वेतन काढल्याचा गंभीर आरोप नगरसेवक विनोद नढे यांनी केला आहे. या प्रकारातून सुमारे ५ ते ८ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा दावा करत त्यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे तात्काळ फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागातील 'शालार्थ प्रणाली'च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मयत, सेवानिवृत्त तसेच इतर विभागांत बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी बंद न करता त्यांच्या नावावर वेतन देयके तयार करून कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याचा गंभीर आरोप माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विनोद नढे यांनी केला आहे.

या कथित गैरव्यवहाराची व्याप्ती सुमारे ५ ते ८ कोटी रुपये असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यासंदर्भात नढे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देत संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी कारवाई करावी, दोषींना निलंबित करावे, आर्थिक नुकसानीची वसुली करावी आणि संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. नढे यांच्या निवेदनानुसार, शिक्षण विभागातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून शालार्थ प्रणालीचा गैरवापर केला.

मयत, सेवानिवृत्त आणि बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी निष्क्रिय न करता त्याच नावावर वेतन देयके तयार करण्यात आली. या माध्यमातून शासन आणि महापालिकेच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात फुगेवाडी येथील दिवंगत लिपिक चंद्रशेखर गैंगले यांच्या नावावर मृत्यूनंतरही वेतन काढण्यात आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.



तसेच २०२१ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक हनुमंत मारणे यांच्या नावावरही नियमबाह्य पद्धतीने वेतन देण्यात आल्याचा आरोप आहे. याशिवाय, शिक्षण विभागातून इतर विभागांत बदली झालेल्या काही कर्मचाऱ्यांचे वेतन संबंधित विभागांतून सुरू असतानाही शालार्थ प्रणालीतील त्यांचे वेतन बंद करण्यात आले नाही, असा आरोप नढे यांनी केला आहे. त्यामुळे एकाच कर्मचाऱ्याच्या नावावर दोन ठिकाणांहून वेतन काढण्यात आल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकारात २५ हून अधिक कर्मचाऱ्यांच्या नावांचा गैरवापर झाल्याचा दावा करण्यात आला आहे. वेतन बिल तयार करणारे अधिकारी, त्याची पडताळणी करणारे कर्मचारी, मंजुरी देणारे अधिकारी आणि आर्थिक व्यवहार हाताळणाऱ्या संबंधितांची भूमिका तपासण्याची मागणीही करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावण्यासाठी २०१८ पासून आजतागायतच्या सर्व शालार्थ पे-बिलांची, सेवा नोंदींची आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र विशेष पथकामार्फत फॉरेन्सिक तपासणी करावी, अशी मागणी नढे यांनी केली आहे.

प्रत्येक कर्मचाऱ्याचा शालार्थ आयडी, सेवा पुस्तिका, बदली आदेश, निवृत्ती दिनांक, मृत्यूची नोंद, प्रत्यक्ष वेतन जमा झालेले बँक खाते आणि महापालिकेतील वेतन नोंदी यांची परस्पर पडताळणी करावी, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. संशयित शालार्थ आयडी तात्काळ गोठवून पुढील आर्थिक व्यवहार थांबवावेत, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून चौकशी सुरू करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### २०१८ पासूनच्या व्यवहारांची फॉरेन्सिक चौकशी करा!

शिक्षण विभागातील 'शालार्थ प्रणाली'अंतर्गत २०१८ पासून आजतागायत झालेल्या सर्व वेतन देयकांची, सेवा नोंदींची आणि संबंधित बँक व्यवहारांची स्वतंत्र विशेष पथकामार्फत फॉरेन्सिक तपासणी करावी. संशयित शालार्थ आयडी तात्काळ गोठवून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबन, फौजदारी कारवाई आणि आर्थिक नुकसानीची १८ टक्के व्याजासह वसुली करावी, अशी मागणी नगरसेवक विनोद नढे यांनी केली आहे.

# लोकशाहीच्या रक्षणासाठी ८ ऑक्टोबरला 'लोकशाही बचाव मार्च'

» पिंपरी | प्रतिनिधी

**लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासह निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी पिंपरी-चिंचवड इंडिया आघाडी, सिव्हिल सोसायटी, पुरोगामी आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी 'लोकशाही बचाव मार्च' काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता आकुर्डी गावातील विठ्ठल मंदिर येथून या मार्चला सुरुवात होणार असून तहसीलदार कार्यालय, निगडी येथे त्याचा समारोप होईल. शहरातील विविध राजकीय, सामाजिक आणि पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लोकशाहीप्रेमी नागरिक या मार्चमध्ये सहभागी होणार आहेत.**



मतदार याद्यांमधील बदल, पात्र मतदारांच्या नावांबाबत निर्माण होणारे प्रश्न तसेच विशेष पुनर्परीक्षण अभियान अर्थात SIR यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असावी, तसेच निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी प्रमुख मागणी या मार्चद्वारे करण्यात येणार आहे. मतदारांच्या हक्कांशी संबंधित कोणत्याही प्रक्रियेत स्पष्टता आणि विश्वासार्हता राहणे आवश्यक असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

आयोजकांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी मार्चमध्ये करण्यात येणार आहे.

तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करून कायद्यानुसार कारवाई करावी, त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या निर्णयांचे स्वतंत्र पुनर्परीक्षण करावे आणि SIR अभियान रद्द करावे, अशा मागण्याही मांडल्या जाणार आहेत.

निवडणूक आयोगाचे कामकाज निष्पक्ष, पारदर्शक आणि स्वतंत्र पद्धतीने चालावे, यासाठी व्यापक सुधारणा आवश्यक असल्याची भूमिका आयोजकांनी घेतली आहे. लोकशाही व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असणे अत्यंत आवश्यक आहे. मतदार यादीतील त्रुटी, नावांची वगळणी किंवा बदल यासंदर्भात निर्माण झालेल्या सर्व शंकांचे अधिकृत आणि समाधानकारक निराकरण व्हावे, अशी मागणी मार्चमधून केली जाणार आहे.

### मार्चमधील प्रमुख मागण्या

मतदार यादी विशेष पुनर्परीक्षण अभियान (SIR) रद्द करावे, निवडणूक आयोगाचे कामकाज निष्पक्ष व पारदर्शक करावे आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या निर्णयांचे स्वतंत्र पुनर्परीक्षण करावे, अशी मागणी मार्चमधून करण्यात येणार आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी भूमिकाही आयोजकांनी मांडली आहे.

# निगडीत बेदरकार ट्रकची हाइट बॅरिअरला जोरदार धडक!

## चिकन चौकात लोखंडी संरचनेचे नुकसान; काही काळ वाहतूक विस्कळीत

**» पुणे | प्रतिनिधी**

**निगडीतील चिकन चौक परिसरात एका मालवाहू ट्रकने लोखंडी हाइट बॅरिअरला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या धडकेत हाइट बॅरिअरचा काही भाग वाकून मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले. अपघातानंतर काही काळ परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. या घटनेचा व्हिडिओही समोर आला असून तो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.**




चिकन चौक परिसरातून अवजड वाहनांची ये-जा नियंत्रित करण्यासाठी तसेच उंच वाहनांना पुढील मार्गावर प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी लोखंडी हाइट बॅरिअर उभारण्यात आले आहे. मात्र, मालवाहू ट्रकने बॅरिअरची उंची लक्षात न घेता पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने जोरदार धडक बसल्याचे प्राथमिक स्वरूपात दिसून येत आहे. धडकेची तीव्रता इतकी होती की बॅरिअरचा काही भाग वाकला असून संरचनेचेही नुकसान झाले आहे.

अपघात घडल्यानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांचा वेग मंदावला आणि काही वाहनचालकांनी घटनास्थळी थांबून पाहणी केल्याने वाहतुकीवर आणखी परिणाम झाला. स्थानिक नागरिकांनीही घटनास्थळी गर्दी केल्याने काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. संबंधित यंत्रणांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

नुकसान झालेल्या बॅरिअरमुळे इतर वाहनांना धोका निर्माण होऊ नये, यासाठी परिसराची पाहणी करण्यात आली. त्यानंतर वाहतुकीचा प्रवाह टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

या घटनेमुळे चिकन चौक परिसरातून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. हाइट बॅरिअर उभारण्यामागचा उद्देशच अवजड आणि अतिउंच वाहनांना पुढील मार्गावर जाण्यापासून रोखणे हा असताना अशा वाहनांकडून वारंवार नियमांकडे दुर्लक्ष होत असेल, तर त्यावर कठोर नियंत्रणाची गरज असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा वाहतूक कमी असताना काही मालवाहू वाहनचालक वेगाने वाहन चालवत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून यापूर्वीही करण्यात आल्या आहेत.

हाइट बॅरिअरसमोर पुरेशा अंतरावर स्पष्ट इशारा फलक, रिफ्लेक्टर, उंचीची मर्यादा दर्शविणारे बोर्ड आणि रात्रीच्या वेळी चांगली प्रकाशव्यवस्था असणे आवश्यक असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र, अशा प्रकारची धडक अधिक गंभीर ठरू शकते आणि बॅरिअरचा तुटलेला किंवा वाकलेला भाग इतर वाहनांवर कोसळण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे नुकसान झालेल्या संरचनेची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. दरम्यान, हाइट बॅरिअरचे नेमके किती नुकसान झाले आहे, अपघातावेळी ट्रकचा वेग किती होता आणि चालकाने वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केले का, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# पिंपरीत जड वाहनांची दादागिरी; चौक-गल्ली बनल्या बेकायदा पार्किंग झोन!

**» पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील प्रमुख रस्त्यांवर दिवसा जड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही ट्रक, लॉरी आणि मोठे टेम्पो चौक, रस्त्याच्या कडेला तसेच अंतर्गत गल्लीबोळांत मनमानीपणे उभे राहत असल्याचे चित्र दिसत आहे. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकासारख्या वर्दळीच्या ठिकाणी भररस्त्यात मोठी वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून वाहनचालकांना मोठ्या कसरतीने मार्ग काढावा लागत आहे. विशेष म्हणजे रविवारी आणि सुट्टीच्या दिवशीही जड वाहनांचा प्रमुख मार्गांवरील वावर सुरू असल्याने वाहतूक नियंत्रण आणि नियमांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



प्रमुख रस्त्यांबरोबरच शहरातील अंतर्गत रस्ते आणि गल्लीबोळही जड वाहनांसाठी अनधिकृत पार्किंग झोन बनत चालले आहेत. मोठे टेम्पो आणि मालवाहू वाहने सकाळच्या वर्दळीच्या वेळेत अरुंद रस्त्यांवर उभी राहिल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी दोन वाहने समोरासमोर आली तर एकाला मागे घ्यावे लागते, तर पादचाऱ्यांनाही रस्त्यावरून जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

जड वाहनांच्या चुकीच्या पार्किंगचा फटका केवळ वाहतूक कोंडीपुरता मर्यादित राहत नाही. रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने किंवा अन्य आपत्कालीन सेवा अशा ठिकाणी अडकल्यास काही मिनिटांचाही विलंब गंभीर परिणाम घडवू शकतो. त्यामुळे या प्रकाराकडे केवळ पार्किंगच्या नियमभंग म्हणून न पाहता सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. शहरातील काही भागांत मालवाहू वाहने रस्त्याच्या कडेला तासन्तास उभी ठेवली जात असून अनेक ठिकाणी रस्त्यावरच माल चढविणे आणि उतरविण्याचे प्रकार सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

त्यामुळे आधीच मर्यादित रुंदी असलेल्या रस्त्याचा मोठा भाग व्यापला जातो आणि वाहतुकीची गती मंदावते. अशा वाहनांमुळे दृष्टीआड होणारे वळण, चौकातील अडथळे आणि अचानक समोर येणारी वाहने यामुळे अपघाताचा धोका वाढत असल्याचीही चिंता व्यक्त होत आहे.

सुट्टीच्या दिवशी वाहतूक तुलनेने कमी असते, याचा फायदा घेत जड वाहनचालक शहराच्या मध्यवर्ती भागात वाहने उभी करत असल्याचे चित्र वारंवार पाहायला मिळते. मात्र, प्रवेशबंदीच्या वेळा आणि नो-पार्किंगचे नियम हे सर्व दिवस समानपणे लागू असताना रविवारी नियम शिथिल झाले आहेत का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. वाहतूक पोलिसांकडून नियमित गस्त, दंडात्मक कारवाई आणि टोइंगची मोहीम राबविली जात नसल्याने ही समस्या वाढत असल्याचा आरोपही केला जात आहे.

पिंपरी हे शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या भागांपैकी एक असून बाजारपेठा, व्यापारी आस्थापने, रुग्णालये, शाळा आणि सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा येथे मोठ्या प्रमाणात आहेत. अशा भागात जड वाहनांचे अनधिकृत पार्किंग झाल्यास त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक व्यापाऱ्यांवर होतो. गर्दीच्या वेळेत ही समस्या अधिक गंभीर होत असल्याने छोट्या अंतरासाठीही वाहनचालकांना मोठा वेळ खर्च करावा लागत आहे.

जड वाहनांना शहराबाहेर किंवा निश्चित केलेल्या ट्रान्सपोर्ट पार्किंग क्षेत्रातच थांबण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रमुख चौकांमध्ये जड वाहनांसाठी स्पष्ट बंदी फलक, सीसीटीव्हीच्या माध्यमातून निरीक्षण, टोइंग व्हॅनची उपलब्धता आणि नियमभंग करणाऱ्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक कारवाई केल्यास परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते. केवळ अधूनमधून कारवाई करण्याऐवजी सातत्यपूर्ण नियंत्रणाची आवश्यकता असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. वाहतूक पोलिसांनी प्रवेशबंदीच्या वेळेत शहरात प्रवेश करणाऱ्या जड वाहनांवर लक्ष ठेवावे, नो-पार्किंग क्षेत्रात उभ्या वाहनांवर तात्काळ कारवाई करावी आणि रस्त्यावर माल उतरविणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र वेळ निश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

अन्यथा चौक, रस्ते आणि गल्लीबोळांमधील या मनमानी पार्किंगमुळे वाहतूक कोंडी आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, शहरातील जड वाहनांच्या पार्किंगसाठी स्वतंत्र धोरण आहे का, प्रवेशबंदीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर किती कारवाई झाली आणि संवेदनशील चौकांमध्ये नियमित तपासणी होते का, याबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# ‘48 तासांत निर्णय घ्या, अन्यथा पुणे बंद!’

## राजीनाम्यावर रोहित पवार आक्रमक; राहुल गांधीही आंदोलनस्थळी येणार

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने आता अधिक तीव्र वळण घेतले आहे. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारला थेट ४८ तासांचा अल्टिमेटम दिला असून, या कालावधीत MPSC अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय झाला नाही, तर विद्यार्थी पुणे बंद करतील किंवा मुंबईतील मंत्रालयावर धडकतील, असा इशारा दिला आहे. विद्यार्थ्यांचा प्रश्न हा राजकारणाचा नसून त्यांच्या भवितव्याचा असल्याचेही पवार यांनी ठामपणे सांगितले.**



विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न असून त्याकडे राजकीय चष्म्यातून पाहू नये, अशी भूमिका रोहित पवार यांनी मांडली. राज्यभरातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरले असून सरकारने त्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून केली जात आहे.

आंदोलन अधिक काळ लांबविण्याऐवजी निर्णायक तोडगा काढावा, असा दबाव आता वाढत आहे. MPSCच्या विविध परीक्षांबाबत विद्यार्थ्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून असंतोष वाढला आहे. परीक्षा प्रक्रिया, आयोगाच्या निर्णयांतील पारदर्शकता, पेपरफुटीबाबत उपस्थित होणारे प्रश्न, भरती प्रक्रियेला होणारा विलंब आणि उमेदवारांमध्ये निर्माण झालेला अविश्वास या मुद्द्यांवर विद्यार्थी आक्रमक झाले आहेत.

आयोगाच्या कामकाजात स्पष्टता आणि विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणीही आंदोलनातून होत आहे.

रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सरकारला स्पष्ट इशारा दिला. MPSC अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याचा निर्णय पुढील ४८ तासांत झाला नाही, तर आंदोलनाची पुढील दिशा अधिक तीव्र असेल, असे त्यांनी सांगितले. पुणे बंद किंवा मंत्रालयावर मोठा मोर्चा काढण्याचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर खुला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात विरोधी पक्षातील अनेक नेते सहभागी होत असून विद्यार्थ्यांच्या मागण्यांना राजकीय पाठिंबा वाढत आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे येत्या बुधवार किंवा गुरुवारी, म्हणजे ८ किंवा ९ ऑक्टोबर रोजी आंदोलनस्थळी उपस्थित राहतील, अशी माहिती रोहित पवार यांनी दिली. राहुल गांधी यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला राष्ट्रीय स्तरावर अधिक लक्ष मिळण्याची शक्यता आहे. राहुल गांधी आंदोलनात सहभागी झाल्यास मोठ्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरतील, असा दावा रोहित पवार यांनी केला. एक लाखाहून अधिक विद्यार्थी पुण्यात एकत्र येऊ शकतात आणि त्यामुळे शहरातील जनजीवनावर मोठा परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर पुढील दोन दिवस प्रशासन आणि राज्य सरकारसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. दरम्यान, मत्स्यव्यवसाय आणि बंदरविकासमंत्री नितेश राणे यांनीही या आंदोलनावर प्रतिक्रिया दिली आहे.

रोहित पवार यांनी आंदोलन करावे, मात्र विद्यार्थ्यांना राजकारणासाठी वेठीस धरू नये, असे त्यांनी म्हटले. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा हा प्रश्न असल्याने आंदोलनाला राजकीय रंग देऊ नये, अशी भूमिका राणे यांनी मांडली. नितेश राणे यांच्या या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना रोहित पवार यांनी त्यांच्यावर उपरोधिक टीका केली.

राणे हे भरकटलेले आहेत, असे म्हणत त्यांनी त्यांच्या वक्तव्यावर टोला लगावला.

# MPSC आंदोलनात राज ठाकरेंचा सरकारवर घणाघात!

**» पुणे | प्रतिनिधी**

**ओतूर येथे डॉक्टर दाम्पत्याच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारत लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. घर दोन दिवस बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तोडत घरात प्रवेश केला आणि कपाटांची उचकापाचक करून सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम घेऊन पोबारा केला. भरवस्तीत घडलेल्या या धाडसी घरफोडीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला रविवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला. आंदोलनस्थळी उपस्थित हजारो विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या कारभारावर जोरदार टीका केली. “मी इथे भाषण करायला नाही, तर तुमच्या रागात सामील व्हायला आलोय,” असे म्हणत त्यांनी विद्यार्थ्यांच्या असंतोषाला थेट शब्द दिले.

राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून घेतल्यानंतर परीक्षा प्रक्रियेतील विलंब, निकाल रखडणे आणि वारंवार निर्माण होणाऱ्या अनिश्चिततेवर प्रश्न उपस्थित केले. वर्षानुवर्षे अभ्यास करूनही विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा, निकाल आणि नियुक्ती मिळत नसेल तर हा केवळ प्रशासकीय प्रश्न राहत नाही, तर त्यांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न बनतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा राग तात्पुरता न राहता व्यवस्थेला जाब विचारणारा ठरला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

तरुणांना उद्देशून बोलताना राज ठाकरे यांनी जातीपातीच्या राजकारणापासून दूर राहण्याचे आवाहन केले. बेरोजगारीला जात नसते आणि नोकरीच्या प्रश्नावर सर्व तरुणांनी एकत्र उभे राहिले पाहिजे, असे ते म्हणाले. राजकीय स्वार्थासाठी समाजात विभागणी केली जाते, परंतु रोजगार, परीक्षा आणि भवितव्याचे प्रश्न सर्वांसाठी समान आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. “तरुणांना हक्काच्या नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत.

सरकारकडे रोजगाराचे स्पष्ट आणि ठोस नियोजन असले पाहिजे. महाराष्ट्रातील तरुणांच्या नोकरीसाठी गरज पडली तर कोणाचेही पाय धरायला मी तयार आहे,” असे विधान करत राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आपली भूमिका अधिक ठाम केली. राज्यातील परीक्षा गैरव्यवहार आणि राजकीय घडामोडींवर भाष्य करताना त्यांनी उपरोधिक शैलीत सरकारवर निशाणा साधला. “तुमच्याकडे परीक्षेचे पेपर फुटतायत आणि आमच्याकडे जनतेने दिलेली मतं फुटतायत,” असे म्हणत त्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. निवडून आलेल्या सत्ताधाऱ्यांच्या डोक्यातील गैरसमज जनतेने दूर केला नाही, तर सामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

परीक्षेतील कथित गैरप्रकार, भरती प्रक्रियेतील विलंब आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे असंतोष वाढत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला अधिक राजकीय आणि सार्वजनिक महत्त्व मिळाले. विद्यार्थ्यांनीही घोषणाबाजी करत त्यांच्या वक्तव्यांना प्रतिसाद दिला. केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांवरही राज ठाकरे यांनी टीका केली. “दिसली जमीन की दे अदानीला, दिसलं पोर्ट की दे अदानीला,” अशा शब्दांत त्यांनी मोठ्या उद्योगसमूहांना दिल्या जाणाऱ्या कथित प्राधान्यावर प्रश्न उपस्थित केला. सर्वसामान्य तरुणांच्या रोजगाराचे काय, त्यांच्या भविष्याचे काय, असा परखड सवालही त्यांनी सरकारसमोर ठेवला. राज ठाकरे म्हणाले की, जनतेशी संवाद साधण्याऐवजी सत्ताधाऱ्यांकडून एकतर्फी निर्णय घेतले जात आहेत.